**Studies in Indian Place Names (UGC Care Journal)**
ISSN: 2394-3114Vol-40, Special Issue-05
NAAC sponsored two days National Conference on New Accreditation Process and Quality Enhancement for rural colleges
Held on 4 and 5th February 2020
SunderraoSolankeMahavidyalaya, Majalgaon Dist. Beed, Maharashtra, India. 431 131

# "नॅक मुल्याकनात विदयार्थ्यांची भुमिका"

**प्रा.डॉ.सोमाणी जी.व्ही**
**सहाय्यक प्राध्यापक**
**कै.रसिका महाविदयालय, देवणी**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण व कृती कार्यक्रम 1986 च्या निर्देशानुसार व सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार नॅक या संस्थेची स्थापना करण्यात आली नॅक हे राष्ट्रीय मुल्यांकन अधिमान्यता समिती असे पुर्ण रुप आहे.संस्थेची स्थापना 16 सप्टेंबर 1994 रोजी विदयापीठ अनुदान आयोगाने केली असुन ही एक सवायत संस्था आहे विविध शैक्षणिक संस्थामधील महाविदयालये व विदयापीठे यांच्या गुणवत्तेची सत्य पडताळणी करुन त्यांचे यथायोग्य मुल्यमापन करणे त्याचप्रमाणे त्या संस्थेला योग्य तो दर्जा प्रदान करणे हे नॅक चे मुख्य उदिष्ट आहे विदयापीठ अनुदान आयोग (UGC) व अखिल भारतीय तंत्रशिक्षण मंडळ (AICTE) या संस्था च्या अंतर्गत येणाऱ्या महाविदयालयांनी स्वत:चे नॅक दवारे मुल्यमापण करुन किमान दर्जा मिळवणे आवश्यक आहे शैक्षणिक संस्थांचे मुल्यमापन करताना नॅक खालील बाबीवर भर देते.

1) अभ्यासक्रम विषयक बाबी
2) अध्यापन व अध्ययन मुल्यमापन
3) संशोधन सल्लामसलत व विस्तार
4) पायाभुत सुविधा व अध्ययन संसाधने
5) विदयार्थी मदत व त्यांची प्रगती
6) संघटन व्यवस्थापन व नेतृत्व
7) पोषक प्रघाती

या सर्व शैक्षणीक घटकांचे मुल्यमापन नॅक करते या मुल्यांकनामध्ये विदयापीठ, स्वायलत महाविदयालये व सलग्नीत महाविदयालये या सर्वांना 1000 गुणाचे मुल्याकण वरील 07 घटकांच्या अधारे केले जाते ज्यामध्ये महाविदयालयांना गुणानुक्रमे खालील दर्जा प्राप्त होतो

Studies in Indian Place Names (UGC Care Journal)
ISSN: 2394-3114Vol-40, Special Issue-05
NAAC sponsored two days National Conference on New Accreditation Process and Quality Enhancement for rural colleges
Held on 4 and 5th February 2020
SunderraoSolankeMahavidyalaya, Majalgaon Dist. Beed, Maharashtra, India. 431 131

| CGPA | Grade |
| --- | --- |
| 3.51-4.00 | A++ |
| 3.26-3.50 | A+ |
| 3.01-3.25 | A |
| 2.76-3.00 | B++ |
| 2.51-275 | B+ |
| 2.01-2.50 | B |
| 1.51-2.00 | C |
| 1.50 पेक्षा कमी | D |

मुल्यांकित महाविदयालयाला 1.50 पेक्षा कमी CGPA असेल तर ते महाविदयालय मुल्यांकीत महाविदयालय राहणार नाही. सुधारीत मुल्यांकन पद्धती जुलै 2017 नुसार नॅक चे मुल्यांकण पारदर्शक व डिजीटल पद्धतीने केले जाणार असुन या मध्ये महाविदयालयाशी संबंधीत विदयार्थी, माजी विदयार्थी संबंधीत व्यक्ती यांच्याकडुन ऑनलाईन पदधतीने माहिती जमा केली जाणार आहे ज्याला 70 टक्के भर असणार आहे तर नॅक मुल्यांकणावेळी येणाऱ्या सदस्याकडुन 30टक्के गुण दिले जाणार आहेत यामुळे नॅक चे मुल्यांकण हे अत्यंत पारदर्षक होण्यास मदत होईल.

## नॅक व विदयार्थी

सध्य स्थीथीत असणारे नॅक मुल्यांकण हे विदयार्थी विमुख आहे कारण 70 टक्के गुण हे विदयार्थी समाधान सर्वेक्षणातील माहितीवर अधारीत आहे यामुळे नॅक च्या विविध 07 घटकातील सर्वच निर्देष विदयार्थी दृष्टीने आहेत. ज्यावेळी स्व.अध्ययन अहवाल (SSR) दिला जातो त्यावेळी बरीच माहिती ही प्रत्यक्ष विदयार्थीला जोडणारी व अप्रत्यक्षरित्या विदयार्थी केंद्रीभुत आहे यामुळे प्राचार्य कॉलेज व्यवस्थापन या घटकापेक्षा नॅक ने विदयार्थी हाच शिक्षणाचा केंद्रबिंदु केल्याचे दिसुन येते.

विदयार्थी संख्या, विषय विविधता, विषय निवडीत पर्याय, विदयार्थी गळती, अध्यापन व अध्ययन पद्धती, अध्यापनात दृक–श्राव्य माध्यमाचा वापर , मुल्यमापन पद्धती, विदयार्थी उत्तीर्ण प्रमाण व शिक्षा– सांफल्य व विदयार्थी समाधान सर्वेक्षण या सर्व घटकांचा समावेश नॅक ने आपल्या दुसऱ्या घटकात केला आहे ज्यासाठी 1000 पैकी 350 गुण सलग्नीत महाविदयालयास तर 300 गुण

स्वायत्त महाविदयालयास मिळणार आहे त्यामुळे सलग्नीत महाविदयालयाला 35टक्के गुण या घटकाअधारे प्राप्त करता येऊ शकतात तर नॅकच्या 5 व्या घटकांत विदयार्थी सहाय्यता व विदयार्थी प्रगती हा घटक समाविष्ठ आहे या घटकासाठी सलग्नीत महाविदयालयाला 130 गुण मिळणार आहे. ज्यामध्ये विदयार्थी सहाय्यता, विदयार्थी विकास, विदयार्थंचा सहभाग व माजी विदयार्थी संघटन हे घटक समाविष्ठ आहेत एकंदरीत दुसऱ्या व पाचव्या विदयार्थी घटकासाठी 480 गुण सलग्नीत महाविदयालयास भेटतात.

विदयार्थीशी सबंधीत या घटकांसाठी महाविदयालयातील प्रत्येक विभागाने

1) विदयार्थी यादी (पुर्ण माहितीसह)
2) विदयार्थी निकाल (टक्केवारीसह)
3) विदयार्थ्यांची अंतर्गत परिक्षा पद्धत व मुल्यमापन
4) शैक्षणीक व औदयोगीक सहल
5) विदयार्थी दत्तक योजना
6) विदयार्थी मंडळ व त्या अंतर्गत कार्यक्रम
7) विदयार्थी प्रकल्प अहवाल व संशोधन अहवाल
8) माजी विदयार्थी व त्यांची सध्य स्थीती
9) वार्षिक नियोजन व वेळापत्रक
10) विदयार्थ्यांना विषय निवडीचे पर्याय

अशा भागामध्ये विभागणी करुन अदययावत नोंदी ठेवाव्यात एकंदरीत विदयार्थी हा अध्यापनाचा केंद्रबिंदु असल्याने केवळ उच्च शिक्षण देणे इतकाच उद्देश नॅक ने आपल्यासमोर ठेवला नसुन विदयार्थ्यांचे उज्जवल भविष्य घडवणे विदयार्थ्यांना स्वयंरोजगार, उदयोग याकडे वळवणे यामुळे एक सशक्त राष्ट्र उभारणी होण्यास मदत होईल या दृष्टीने विदयार्थी केंद्रीत नॅक ची रचना करण्यात आली आहे.

**संदर्भ**

1) सेट–नेट मार्गदर्शक–प्रा.ब्रिजमोहन दायमा
2) WW.NAAC.COM

IQAC-COORDINATOR
Kai.Rasika Mahavidyalaya, Deoni
Tq.Deoni Dist.Latur

Kai. Rasika Mahavidyalaya Deoni Tq. Deoni Dist. Latur

Principal
Kai. Rasika Mahavidyalaya, Deoni
Tq. Deoni Dist. Latur